B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal

Impact Factor - ( (SJIF) -7.675,
Issue No,235

ISSN :
2278-9308
June
2020

Impact Factor – 7.675 ISSN – 2278-9308

# B.Aadhar

## Peer-Reviewed Indexed

***Multidisciplinary International Research Journal***

JUNE - 2020
ISSUE No – CCXXXV ( 235)

**Prof. Virag.S.Gawande**
Chief Editor :
Director
Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.

**Dr. R.S.Satbhai**
Executive Editor
Local Secretary
Adv.B.D.Hambarde Mahavidyalaya Ashti

**Guest Editor**

**Dr. S.R.Nimbore**
Principal
Adv.B.D.Hambarde
Mahavidyalaya Ashti

**Dr. Satish Kadam**
President,AMIP&
Head,Dept of History
YCM,Tuljapur

**Dr. Shivraj Bokade**
Secretary,AMIP&
Head,Dept of History
YC,Nanded

## Aadhar International Publication

© All rights reserved with the authors & publisher



Scanned by Scanner Go

| | | |
|---|---|---|
| 214 | राज्यपालांचा हस्तक्षेप आणि संसदीय लोकशाहीस धोका **प्रा डॉ. दत्तात्रय रामचंद्र डुबल** | 954 |
| 215 | महात्मा ज्योतिबा फुले यांच्या काळातील सामाजिक परीस्थीती **प्रा. सुरेश देवशेट्टे** | 958 |
| 216 | छ.संभाजी महाराजांच्या काळातील वाकड येथील अप्रकाशित शिलालेख . काळ – इ. सन. १६८१ **प्रणव विजयकुमार पाटील** | 961 |
| 217 | मानव अधिकाराचे आंतरराष्ट्रीयकरण **प्रा.श्रीरंग शामराव लोखंडे.** | 965 |
| 218 | राजर्षी शाहू महाराजांनी बहुजनांच्या उद्धारासाठी केलेले शैक्षणिक कार्य **प्रा. प्रमोद एस. मेश्राम** | 968 |
| 219 | शिक्षणाचे तत्वज्ञान यावर स्वामी विवेकानंद यांचा दृष्टिक्षेप **डॉ. विनायक उद्धवराव पाटील** | 972 |
| 220 | प्राचीन भारतीय इतिहास का वैज्ञानिक विश्लेषण रू तथ्य तर्क आधारित सूक्ष्माग्राही विवेचन **डॉ . शुचि** | 977 |
| 221 | शिवराज्याभिषेक : सार्वभौमत्वाचा सोहळा **डॉ. संजय तुकाराम वाघमारे** | 982 |
| 222 | १९७५ ची आणीबाणी आणि वृत्तपत्रे **प्रा.धनंजय राधाकिशन जवळेकर** | 988 |
| 223 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि पत्रकारिता **प्रा.सुमन लक्ष्मणराव केंद्रे** | 991 |
| 224 | History Of Old Indian Currency **Dr. Mangesh Shirsath** | 993 |
| 225 | Gangavathi region – through the ages: Economic condition **Bajrang bali** | 999 |
| 226 | Relevance Of Mahatma Gandhi's Philosophy In Modern Context **Dr. Vandana M. Mahure** | 1002 |
| 227 | Cultural Effect in Indian History **Dr. Priyanka Kumari** | 1005 |
| 228 | Implementation Of Four Bar Mechanism In Wheelchair **Yash Kiran Prabhu** | 1009 |
| 229 | Problems faced and strategies adopted by school teachers in use of technology in education. **Dr. Shobha Gaikwad** | 1015 |
| 230 | स्त्रीमुक्ती चळवळीचे बदलते स्वरूप **प्रा. सांगळे बी. के.** | 1018 |
| 231 | भारतीय कलेतील लज्जागौरी देवतेचे विविध रूपे (विषय संदर्भ - तेर) **डॉ. सुनिल रामचंद्र पुरी** | 1022 |
| 232 | **सरदार रावरंभा निंबाळकर घराणे** **सुरेखा जगन्नाथ पाटील** | 1028 |




Scanned by Scanner Go

# स्त्रीमुक्ती चळवळीचे बदलते स्वरूप

प्रा. सांगळे बी. के.

इतिहास विभागप्रमुख  अण्णासाहेब आवटे कॉलेज, मंचर. जि. पुणे

**प्रस्तावना –**

प्राचीन व वैदिक काळात बालविवाह, विधवाविवाह बंदी, सतीप्रथा, केशवपन यांसारख्या जाचक रूढी नव्हत्या. समाजात स्त्रीयांना चांगले स्थान होते. मध्ययुगीन काळात मात्र मुस्लिम आक्रमणांमुळे स्त्री रक्षणासाठी तिच्यावर अनेक जाचक बंधने लादण्यात आली. या सामाजिक बंधनामुळे स्त्रीयांची स्थिती अतिशय दयनीय झाली होती. १९ व्या शतकात सामाजिक सुधारणा चळवळीस सुरूवात झाली. तेव्हा सुधारकांचे लक्ष प्रथम स्त्रीविषयक समस्यांकडे गेले. ज्या समाजातील स्त्री उपेक्षीत, अविकसीत असेल तो समाज विकसीत होणे शक्य नव्हते. हिंदू समाजातील अनेक प्रथा, परंपरामुळे स्त्री वर्ग दडपला गेला होता. स्त्रीयांच्या बाबतीत घरात व समाजातही अनास्थाच होती. मात्र इंग्रजांनी भारतात मुलींसाठी शिक्षण सुरू केले. स्वतंत्र संस्थाही सुरू झाल्या. त्यामुळे स्त्री समस्याविषयक जागृती होण्यास सुरूवात झाली. ब्रिटिशांनी सतीबंदी, बालविवाह बंदी, विधवापुनर्विवाह इ. बाबत सुधारणा केली. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, महर्षी धोंडो केशव कर्वे, वि.रा शिंदे यांना या कार्याला सुरूवात केल्यावर पंडिता रमाबाई, डॉ. आनंदीबाई, डॉ. रखमाबाई, ताराबाई शिंदे आदींनी स्त्री सुधारण्याच्या संदर्भात मुलभूत स्वरूपाचे कार्य केलेले दिसते. स्त्रीयांची स्थीती सुधारून त्यांना सन्मानाचे स्थान प्राप्त करून देण्यासाठी महाराष्ट्रातील समाजसुधारकांनी आपले जीवन या कार्यास वाहून घेतले. त्यातूनच स्त्रीमुक्ती चळवळ महाराष्ट्रात उभी राहिली.

**स्वातंत्र्यपूर्व काळातील स्त्री मुक्तीचे प्रयत्न –**

**महात्मा फुलेंचा स्त्रीसुधारणाविषयक दृष्टीकोन व कार्य –**

महात्मा फुले यांचा पिंड हा कृतीशील क्रांतीकारकाचा होता. फुलेंनी समाजातील विषमता नष्ट करण्यासाठी अथक प्रयत्न केले. समाजात जातीभेद, विषमता, अज्ञान, स्त्रीदास्य यांसारख्या अनिष्ट प्रथा केवळ धर्मामुळे दृढमूल झाल्या आहेत असे फुलेंचे स्पष्ट मत होते. या सर्व बाबींचा विचार करून त्यांनी स्त्रीयांच्या उध्दाराचे कार्य हाती घेतले. हिंदू स्त्रीयांना गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी त्यांनी प्रयत्न सुरू केले. भारतीय समाजाने स्त्रीयांना समतेपासून व शिक्षणापासून वंचित ठेवले होते. व्यक्तीचे जीवन विकसीत करण्यासाठी शिक्षण हे प्रमुख साधन आहे असे फुलेंचे मत बनले. 'जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाते उध्दारी' या तत्वाचे फुले पाईक होते. त्याकाळी चुल व मुल एवढेच स्त्रीयांचे कार्यक्षेत्र निश्चित केलेले होते. बाल विवाह, कुमारी विवाह, जरठ विवाह अशा प्रथांमुळे विधवांची स्थिती दयनीय झाली होती. समाजाकडून त्यांना तुच्छतेची वागणूक दिली जात होती. विधवा स्त्रीला केशवपन करून विद्रूप केले जाई. धार्मिक विधी व उत्सवापासून त्यांना वंचित ठेवले जाई. जर एका स्त्रीला शिक्षण दिले तर ते संपूर्ण कुटुंबाला दिल्यासारखे आहे, हे ओळखून फुलेंना स्त्री शिक्षणास प्रारंभ केला. त्यासाठी फुलेंनी १८४८ साली पुण्यात मुलींच्या शिक्षणासाठी एक शाळा सुरू केली. अस्पृश्य स्त्रीयांनाही तेथे शिक्षण दिले जात होते. फुलेंनी त्यांची पत्नी सावित्रीबाईंना शिकवून शिक्षिका म्हणून त्याच शाळेत नेमले. सनातन्यांना ही बाब समाजद्रोही वाटली. त्यांच्याविरूध्द प्रचंड संतापाची लाट उसळली. सनातन्यांनी सावित्रीबाईंना शाळेत जाताना येताना खुप त्रास दिला. १८५१ मध्ये बुधवार पेठ, पुणे



Scanned by Scanner Go

येथे दुसरी मुलींची शाळा उघडली. १८५१ मध्ये रास्ता पेठेत तिसरी व १८५२ मध्ये वेताळ पेठेत चौथी मुलींची शाळा सुरू केली.[१]

**विधवा पुनर्विवाह —**

त्याकाळी ब्राम्हण समाजात विधवांचे फार हाल होत असत. त्यांचे हाल थांबावेत त्यांच्या जीवनाला चांगले वळण लागावे म्हणून फुलेंनी विधवा पुनर्विवाहाचा धडाडीने पुरस्कार केला. १८६४ मध्ये पुण्यात गोखल्यांच्या बागेत एक विधवा पुनर्विवाह घडवून आणला.

**बालहत्या प्रतिबंधकगृह —**

एखाद्या विधवेचे चुकून वाकडे पाऊल पडले तर तिची वाईट अवस्था होई. अशा विधवा पतितांना भ्रुणहत्या, आत्महत्या याशिवाय गत्यंतर नव्हते. अशा आपत्तीतून विधवांची सुटका व्हावी म्हणून फुलेंनी बालहत्या प्रतिबंधकगृह आपल्या घराशेजारी १८६३ मध्ये उघडले. जेथे अशा विधवा स्त्रीया गुप्तपणे येऊन बाळंत होत असत व आपले मुल तेथे ठेवत असत. विधवांना समजण्यासाठी म्हणून फुलेंनी पुणे शहरात सर्वत्र बोर्ड लावून बालहत्या प्रतिबंधकगृहाची जाहिरात केली.[२]

**विठ्ठल रामजी शिंदे यांचा स्त्री सुधारणाविषयक दृष्टीकोन —**

महर्षि शिंदेंचा स्त्रीयांच्या प्रश्नाकडे पाहण्याचा दृष्टीकोन समतावादी व पुरोगामी होता. त्यामुळेच स्त्रीयांचे शिक्षण विवाह व त्यांना द्यावयाच्या स्वातंत्र्याविषयी ते सदैव आग्रही व क्रियाशील होते. त्यांनी स्वत:च्या घरापासून स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार केला होता. मनुस्मृतीसारख्या धर्मग्रंथानी स्त्रीला कोणत्याही प्रकारचे स्वातंत्र्य अमान्य केले होते. आगरकरांच्या सुधारणावादी पत्रामुळे स्त्रीविषयक दाक्षिण्यभावाला, सुधारणावादी विचारांना खतपाणी मिळते. त्यांनी त्यांची बहीण जनाक्काचा सासरी छळ होत असल्याने आपल्या घरी आणून त्यांना ख्रिश्चन मिशनरी स्कूल मध्ये घातले. त्यांनी स्वत:च्या पत्नीलाही शाळेत घातले. स्त्रीविषयक विचार चिंतन करण्यापूर्वी त्यांनी आपल्या घरातून स्त्रीमुक्ती विचार कृतीत आणला असे म्हणता येईल.[३]

**स्त्रीसुधारणाविषयक समाजजागृतीचे प्रयत्न —**

स्त्रीसंबंधी शतकानुशतके समाजात रूजलेल्या कल्पना सहज नष्ट होणाऱ्या नव्हत्या किंवा स्त्रीविषयक समस्या केवळ कायदे करून सुटणाऱ्या नव्हत्या. याची समाजसुधारकांना जाणीव होती त्यामुळे त्यांनी समाजजागृतीसाठी वृत्तपत्रे नियतकालिके, व्याख्याने हे मार्ग अवलंबिले. बाळशास्त्री जांभेकरांनी विधवा पुनर्विवाह व स्त्रीशिक्षणाचा जोरदार पुरस्कार केला. लोकहितवादींनी प्रभाकर या वृत्तपत्रातून जी शतपत्रे लिहीली. त्यातून त्यांनी स्त्री — पुरूष समानतेचा जोरदार पुरस्कार केला. स्त्रीवर अन्याय करणाऱ्या धर्मकल्पनांवर त्यांनी हत्यार उपसले. सतीप्रथा, बालविवाह प्रथा, पुनर्विवाह बंदी, केशवपन यावर त्यांनी कडाडून टिका केली. विष्णूशास्त्री पंडितांनीही बालविवाह प्रथा, पुनर्विवाह बंदी, केशवपन, जरठकुमारी विवाह इत्यादींवर इंदूप्रकाश या वृत्तपत्रातून निर्भिडपणे आपली मते मांडली. व्याख्याने, चर्चा किर्तने या माध्यमातूनही त्यांनी जनजागृती केलेली दिसते.[४]

**सतीप्रथा बंदीसाठीचे प्रयत्न —**

पुण्याचे कलेक्टर रॉबर्टसनने शास्त्रीय पंडितांचे मत अजमावून शास्त्रानुसार सती जाण्याचे बंधनकारक असल्याचे जाणून घेतले. १८२९ मध्ये विल्यम बेंटिंगने कायद्याने सतीबंदी केली तेव्हा कलकत्त्यातील सनातन्यांनी निषेधसभा भरविल्या मात्र मुंबईत नाना शंकर शेठ यांनी गव्हर्नर जॉन माल्कम यांच्या सतीप्रथा निर्मुलनाच्या प्रयत्नांना पाठिंबा दिला.



Scanned by Scanner Go

**बालविवाह बंदीसाठीचे प्रयत्न —**

बालविवाह व जरठविवाहामुळे स्त्रीयांच्या जीवनात विविध समस्या निर्माण होत असत. नामवंत पत्रकार व स्त्री सुधारक बेहरामजी मलबारी यांनी बालविवाह व सक्तीचे वैधव्य यावर निवेदने तयार करून ग.ज. लॉर्ड रिपन यांना सादर केली. कॉंग्रेसच्या भारतीय सामाजिक परिषदेतही सामाजिक सुधारणांचा जोरदार पुरस्कार केला. मलबारींनी इंग्लंडला जाऊन तेथील वृत्तपत्रे, संसद सदस्य, रॉबर्ट स्पेन्सर सारखे तत्ववेत्ते व स्त्री विचारवंतांमार्फत हिंदुस्थान सरकारवर दडपण आणले. या प्रयत्नांना यश येऊन १८९१ मध्ये संमतीवयाचा कायदा पास झाला.

विधवा विवाहाचा पुरस्कार —

१८१७ पासून मुंबईमध्ये या चळवळीचा प्रारंभ झाला. गंगाधरशास्त्री फडके, बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी, विष्णूशास्त्री पंडित हे या चळवळीचे प्रणेते मानले जातात. त्यांनी वृत्तपत्रातूव याविषयी जागृती घडवून आणली. पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर यांनीही याबाबत सरकारने कायदा करावा यासाठी प्रयत्न केले. शेवटी सर्वांच्या प्रयत्नांना यश येवून सरकारने विधवाविवाहाला मान्यता देणारा कायदा १८५६ मध्ये संमत केला.

**अनाथबालकाश्रम —**

महात्मा फुलेंचे अनुकरण करून व समाजाची गरज ओळखून न्या. रानडे, लोकहितवादी इ. सुधारकांनी पंढरपूर येथे अनाथबालकाश्रम सुरू केला तो आजही सुरू आहे. १८९० मध्ये पुण्यात पंडिता रमाबाईंनी शारदा सदन स्थापन करून विधवांना आश्रय दिला. तेथे निराश्रीत विधवांची राहण्याची व जेवणाची व्यवस्था केली. तेथेच त्यांना शिक्षण, व्यवहार व गृहशिक्षण देण्याची व्यवस्था केली. १८९६ मध्ये पुण्यात महर्षि कर्वेनी ' अनाथबालिकाश्रम मंडळी ' ही संस्था स्थापन करून विधवांना स्वावलंबी बनविण्याचा प्रयत्न केला.[५]

**स्त्रीशिक्षणाची चळवळ —**

महाराष्ट्रात स्त्री शिक्षणाचे कार्य सुरू करण्याचे श्रेय ख्रिस्ती मिशनऱ्यांकडे जाते. अमेरिकन मराठी मिशनने १८२४ मध्ये तर चर्च मिशनने १८२८ मध्ये महाराष्ट्रात स्त्री शिक्षणाला सुरूवात केली. १८४८ मध्ये बहिरामजी कसेटजी यांनी 'फिमेल एज्युकेशन' हा निबंध ज्ञानपेसारक सभेत वाचला त्यावर बरीच चर्चा होवून मुंबईत जगन्नाथ शंकरशेठ यांच्या वाडयात स्त्रीयांसाठी शाळा सुरू झाली. त्यानंतर लोहार चाळ, पाळब रोड येथेही मुलींसाठी शाळा सुरू झाल्या. पुण्यात फुलेंनी मुलींसाठी तीन शाळा १८५१ — ५२ मध्ये सुरू केल्या. १८५३ पर्यंत त्या शाळेतील मुलींची संख्या २३७ वर पोहोचली होती. पं. रमाबाई रानडेंनी १८८९ मध्ये मुंबईत विधवा व कुमारिकांसाठी शारदासदन शाळा सुरू केली. ती पुढे पुण्यात हलविली.[६]

**विसाव्या शतकात स्त्रीयांच्या स्थितीत झालेले परिवर्तन —**

१९३० पासून खऱ्या अर्थाने स्त्रीयांच्या स्थितीत परिवर्तन होऊ लागले. समाज व राजकीय जीवनातील परिवर्तनाने स्त्रीयाविषयीच्या समाजाच्या दृष्टीकोनातही बदल होऊ लागला. स्त्रीयांना स्वातंत्र्य देण्यासही अनुकूल वातावरण निर्माण झाले. स्त्रीशिक्षणाला समाजाचा असणारा विरोध बोथट होत गेला. म. गांधींचा स्त्रीयांच्या बाबतीतील दृष्टीकोनही खुपच उदार होता. सार्वजनिक जीवनात स्त्रीयांचा सहभाग असला पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. त्यामुळेच असहकार, सविनय कायदेभंग, चले जाव चळवळीत स्त्रीयांनी भाग घेतला की ज्यामुळे त्यांचा सामाजिक दर्जा उंचावण्यास मदत झाली.[७]

**स्वातंत्र्योत्तर काळ —**

भारतीय राज्यघटनेने स्त्री पुरूष समानतेच्या तत्वाला बळकटी प्रदान करण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. घटनेने स्त्रीयांना पुरूषांच्या बरोबरीचे सर्व हक्क दिले आहेत. राजकीय



Scanned by Scanner Go

हक्कांमुळे तर स्त्रीयांची प्रतिष्ठा उंचावण्यास मदतच झाली आहे. सरकारने स्त्रीयांना सक्षम बनविण्यासाठी व त्यांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी विविध प्रकारचे पुरोगामी कायदे केले आहेत. या कायद्यांनी स्त्रीयांची सामाजिक व आर्थिक स्थिती सुधारण्यास मोठा हातभार लागला आहे.

**समारोप –**

आज कोणत्याही क्षेत्रात पुरूषांच्या बरोबरीने स्त्रीया काम करत आहेत. याचे बरेचसे श्रेय १९ व्या शतकातील सुधारणा चळवळीला व समाजसुधारकांच्या कार्याला द्यावे लागेल, की ज्यामुळे २० व्या शतकात स्त्री मुक्ती चळवळीने गती घेतली. आजच्या काळात स्त्रीयांच्या समस्या व प्रश्न सोडविण्याचे सर्वच बाजूने प्रयत्न होताना दिसत आहेत. स्त्रीया सर्वच क्षेत्रात काम करण्यासाठी सक्षम बनल्या आहेत. त्यामुळे स्त्री पुरूष समानता निर्माण होण्यास मदत झाली आहे.

**संदर्भ व तळटीपा –**

१. भिडे जी. एल. व पाटील एन.डी., महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९९५, पृ. ७५, ७६.
२. बा.ग. पवार, युगपुरूष महात्मा फुले, मातृभूमी प्रकाशन, तृतीय आवृत्ती, २०००, पृ. ६०, ६१
३. डॉ. शंकरराव कदम, महर्षि विठ्ठल रामजी शिंदे – साहित्य व कार्य, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, जुलै २०००, पृ. १४९ – १५६.
४. भिडे जी. एल. व पाटील एन.डी., महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९९५, पृ. १११, ११३.
५. कित्ता, पृ. १२०, १२१.
६. कित्ता, पृ. १२५, १२६.

वसंत जाधव, आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास, विद्या प्रकाशन नागपूर,२००५, पृ. २०



Scanned by Scanner Go